# ज्ञानयुगाचा मागोवा घेणाऱ्या शैक्षणिक संस्थाच आज टिकणार

## चोपडा : ज्येष्ठ अणू शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांचे प्रतिपादन



**शिक्षण क्षेत्रात  काम करणाऱ्या  संस्था नेहमी चिरतरुण असतात. शैक्षणिक संस्था हि कधीही म्हातारी होत नाही. असे प्रतिपादन ज्येष्ठ  अणू शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांनी मंगळवारी  येथे चोपडा एज्युकेशन सोसायटी संचालित प्रताप विद्या मंदिराच्या शताब्दी कार्यक्रमाच्या सांगता समारंभात बोलताना केले.**

**या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अनिल काकोडकर व स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू श्री. पंडित  विद्यासागर हे होते. विशेष अतिथी म्हणून माजी मंत्री सुरेशदादा जैन , कविवर्य ना.धो.महानोर , माजी आमदार डॉ सुरेश पाटील सकल  जैन संघाचे संघपती दलीचंद जैन,जैन इरिगेशन सिस्टिमचे अध्यक्ष अशोक जैन,डॉ.विकास हरताळकर ,डॉ.विजय पोतदार,श्री.प्रवीण सप्तर्षी उपस्थित होते.**

**डॉ.काकोडकर म्हणाले कि,या संस्थेने दीर्घ काळ विद्यार्थ्यांची सेवा केली आहे व आज हा संस्थेचा ऋण व्यक्त करण्याचा दिवस आहे.**

**कुलगुरूडॉ.पंडित विद्यासागर म्हणाले की, प्रताप विद्या मंदिर ही शिक्षण क्षेत्रातील त्याग, समर्पण,सेवा,ज्ञानाचे प्रतीक आहे.**

**कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी विधानसभा अध्यक्ष अरुणभाई गुजराथी होते,चोपडा एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन राजाभाई मयूर, अध्यक्ष विठ्ठलदास गुजराथी,सचिव माधुरी मयूर, चंद्रहासभाई गुजराथी, ज्ञानभाई मयूर ,सिद्धार्थ मयूर ,भूपेंद्रभाई गुजराथी उपस्थित होते.**